# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 04 January 2026

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०४ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- मराठीचं वैभव जपण्यासाठी सरकार सर्व मदत करणार- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही
- कृषी संशोधन परिषदेनं विकसित केलेल्या २५ पिकांच्या १८४ सुधारित वाणांचं लोकार्पण
- महापालिका निवडणुकीच्या प्रचाराला वेग

आणि

- ऑलिंपिकचं यजमानपद मिळण्यासाठी भारताकडून जोरदार प्रयत्न सुरू असल्याची पंतप्रधानांची माहिती

****

मराठी भाषेचं वैभव जपण्यासाठी सरकार सर्व मदत करणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिली. सातारा इथं आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन समारोप प्रसंगी ते बोलत होते. जातपात, सीमारेषा ओलांडून माणसं जोडणारी आपली मराठी भाषा आहे. मराठी आपला अभिमान, ओळख, अस्तित्व आहे, असे गौरोवोद्गार त्यांनी काढले. साताऱ्यातलं हे संमेलन सर्वांसाठी अभिमानास्पद असुन,यापुढंही साहित्य संमेलनाद्वारे मराठीचं वैभव जपलं जाइल, असं त्यांनी सांगितलं.

ते म्हणाले –

**बाईट – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

ग्रामीण भागातील साहित्यिकांचं साहित्य, इतर भाषेत अनुवादित करण्यासाठी पुढील वर्षांपासून यशवंतराव चव्हाण यांच्या नावानं भाषा अनुवादीत करण्यासाठी, समिती कार्यान्वित करण्याची घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी संमेलन समारोप सोहळ्यात केली. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे १०० वे शतकपूर्ती मराठी साहित्य संमेलन पुण्यात होणार असल्याची घोषणा मसापचे अध्यक्ष प्रा मिलिंद जोशी यांनी केली.

****

२०२५ या वर्षात देशात १५ कोटी टनांपेक्षा जास्त तांदूळ उत्पादन झाल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. भारतीय कृषी संशोधन परिषदेनं विकसित केलेल्या २५ पिकांच्या १८४ सुधारित वाणांचं शिवराजसिंह यांनी आज लोकार्पण केलं. त्यावेळी ते बोलत होते. तांदूळ उत्पादनात भारतानं चीनला मागे टाकलं असून, भारत हा जगातला आघाडीचा तांदूळ निर्यातदार देश बनल्याचं ते यावेळी म्हणाले. शेतकऱ्यांना रास्त भावात दर्जेदार बियाणं उपलब्ध व्हावं, हे सरकारचं ध्येय आहे. त्या अनुषंगाने गेल्या काही वर्षांमध्ये देशात बियाण्यांचं ३२०० पेक्षा जास्त वाण विकसित करण्यात आलं असून, ते शेतकऱ्यांपर्यंत लवकरात लवकर पोहोचवण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

****

राज्यातल्या २९ महापालिकांच्या निवडणूक प्रचारानं वेग घेतला आहे. ठिकठिकाणी प्रचार फेऱ्या, सभा सुरू झाल्या आहेत. आज रविवार-सुटीचा दिवस असल्यानं राजकीय पक्ष, वैयक्तिक उमेदवार ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्रचारात गुंतले असल्याचं चित्र आहे. महापालिका निवडणुकीत महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून गेल्याबद्दल विरोधी पक्षांनी न्यायालयात धाव घेतली तरी जनादेश महायुतीच्या बाजूनेच असेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. बिनविरोध निवडीला न्यायालयात आव्हान दिलं जाईल, असं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने काल म्हटलं होतं, त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी हे विधान केलं. ते चंद्रपूरमधे प्रचार फेरीत वार्ताहरांशी बोलत होते. विरोधक न्यायालयात जाऊ शकतात, मात्र आपल्याला जनतेने निवडलं आहे याचा पुनरूच्चार मुख्यमंत्र्यांनी केला. तसंच अनेक अपक्ष मुस्लीम धर्मिय उमेदवार देखील बिनविरोध निवडून आल्याचा दावा त्यांनी केला. फडणवीस यांनी आज अमरावती इथंही भाजप शिवसेना युतीच्या

उमेदवारांसाठी फेरी काढली. शहराच्या विकासाठी आपण वचनबद्ध आहोत, असं त्यांनी यावेळी नमूद केलं.

****

महापालिकेची निवडणूक भावनांवर नव्हे तर विकासावर आधारित असेल, अशी भावना भाजपचे नेते, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरमध्ये, प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलतांना व्यक्त केली. उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मराठवाड्यातील जालना, संभाजीनगर, परभणी आणि नांदेडच्या दौऱ्यावर असतील. राज्याल्या सर्व २९ महानगरपालिकांमध्ये मुख्यमंत्री दौरा करणार आहेत, असंही त्यांनी यावेळी नमूद केलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं शिवसेनेच्या प्रचाराचा प्रारंभ खासदार संदीपान भुमरे यांच्या उपस्थितीमध्ये झाला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रचाराला नेते अंबादास दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सुरुवात करण्यात आली. भारतीय जनता पक्षानं पक्षाविरोधी बंडखोरी करणाऱ्या २२ उमेदवारांना निलंबित करण्याचा निर्णय घेतला असल्याचं जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी सांगितलं.

****

मुंबई महापालिकेसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचा जाहीरनामा आज प्रसिद्ध झाला. राज आणि उद्धव ठाकरे यांनी मुंबईत शिवसेना भवन इथं जाहीरनामा प्रसिद्ध करत वार्ताहरांशी संवाद साधला. राज्यात अनेक ठिकाणी झालेल्या बिनविरोध निवडणुकीला यावेळी दोन्ही नेत्यांनी विरोध केला. बिनविरोध निवडणूक होणं हा लोकशाहीचा आणि लोकांचा अपमान आहे, मतदारांना मतदानापासून वंचित ठेवलं जात असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली. ज्या ठिकाणी विरोधी उमेदवार नाहीत तिथली प्रक्रिया रद्द करून पुन्हा एकदा निवडणूक प्रक्रिया राबवावी अशी मागणी त्यांनी केली. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे संवैधानिक पदावर असूनही विरोधकांना दमदाटी करत आहेत, सत्ताधारी पक्षाचा प्रचार करत आहेत, त्यामुळे त्यांना निलंबित करावं अशी मागणीही उद्धव ठाकरे यांनी केली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही बिनविरोध निवडीला विरोध केला. भाजप चुकीचे पायंडे पाडत असून जनतेनं याचा विचार करायला हवा असं ते म्हणाले.

****

सोलापुरातील महापालिका निवडणुकीत बिनविरोधाच्या कारणावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेना विद्यार्थी सेनेचे बाळासाहेब सरवदे यांचा खून झाला असून, त्या पार्श्वभूमीवर मनसे नेते अमित ठाकरे यांनी रविवारी बाळासाहेब सरवदे यांच्या कुटुंबांची भेट घेऊन सांत्वन केले. त्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी, सरवदे यांच्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च करणार असल्याचं सांगितलं.

****

सन २०३६ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकचं यजमानपद मिळवण्याकरता भारत जोरदार प्रयत्न करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. उत्तर प्रदेशात वाराणसी इथं होत असलेल्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धांचं उद्घाटन त्यांनी आज दूरस्थ पद्धतीनं केलं, त्यावेळी ते बोलत होते. विविध खेळांमध्ये २०१४ सालापासून देशाची कामगिरी सातत्यानं सुधारत असून ‘जेन झी’ची तरुण पिढी हातात तिरंगा घेऊन भारताचं प्रतिनिधित्व करताना पाहून देशाचा ऊर अभिमानानं भरून येतो. प्रत्येकाला आपापल्या भूमिका निभावतानाच त्यांच्या जबाबदाऱ्याही पार पाडायच्या असतात. मात्र, जेव्हा प्रत्येकजण आपापल्या जबाबदाऱ्या गांभीर्यानं पार पाडतो, तेव्हाच यशाचं शिखर गाठता येतं. देशाचा प्रवासही याच दिशेनं होत असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

****

विकसित भारत–जी राम जी योजना कष्टकऱ्यांच्या फायद्याचीच असून याद्द्वारे वाढीव मानधन, बेरोजगार भत्ता, मानधन विलंबासाठी व्याज, शंभर ऐवजी सव्वाशे दिवस रोजगाराची हमी देण्यात आली आहे, अशी माहिती केंद्रीय ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली आहे. विकसित भारत– जी राम जी योजनेद्वारे कष्टकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासह ते ग्रामविकासात सार्थकपणे योगदान देतील असं ते यावेळी म्हणाले.
जालना जिल्ह्यातल्या माळशेंद्रा इथले कष्टकरी देविदास कारभारी कापसे यांनी ही योजना लागू झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. ते म्हणाले –

**बाईट – देविदास कारभारी कापसे**

****

गेल्या दशकभरात १७ कोटींहून अधिक नागरिकांना आत्यंतिक दारिद्र्यातून बाहेर काढण्यात यश आल्याबद्दल जागतिक बँकेनं भारताचं कौतूक केलं आहे. महाराष्ट्र, बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यातल्या आत्यंतिक दारिद्र्यात दोन तृतीयांश घट झाल्याचं जागतिक बँकेच्या अहवालात म्हटलं आहे. गेल्या दहा वर्षांत भारताच्या ग्रामीण भागातल्या आत्यंतिक दारिद्र्याचं प्रमाण अठरा टक्क्यावरून दोन पूर्णांक आठ दशांश टक्क्यापर्यंत घसरल्याचं यात म्हटलं आहे. जनधन योजनेमुळे सध्या देशातल्या ८९ टक्के प्रौढ नागरिकांकडे बँक खाती आहेत. या योजनेनं नागरिकांसाठी आर्थिक सुबत्तेचं दार उघडून दिल्याचं जागतिक बँकेच्या अहवालात म्हटलं आहे.

****

६८व्या राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय लष्कराच्या अजय कुमार यानं पुरुषांच्या दहा मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक जिंकलं आहे. रेल्वेच्या शुभम बिस्ला यानं रौप्य, तर हरियाणाच्या अनमोल जैननं कांस्यपदक जिंकलं. तर, कर्नाटकच्या जोनाथन गॅविन अँटनी यानं उत्कृष्ट कामगिरी करत उप-युवा, युवा आणि कनिष्ठ गटांमध्ये सुवर्णपदके जिंकली.

****